महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.


महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार





छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १५ वा दिनांक : २९/०९/२०२४ वार : रविवार

## आयुर्वेद, होमिओपॅथीची दुसरी फेरी उद्यापासून सुरू

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य सामायिक परीक्षा कक्षाने म्हणजेच सीईटी कक्षाने सून आयुष आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या फेरीचे इम, वेळापत्रक जाहीर केले आहे. पत्र त्यानुसार 'आयुष' अंतर्गत येणाऱ्या तर, आयुर्वेद, होमिओपथी व युनानी बाऊ अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची दुसरी जार फेरी २९ सप्टेंबरपासन सुरू होणार ३० आहे. तर फिजिओथेरपी, तिज ॲक्युपेशनल थेरपी, प्रोस्थेटिक ॲड बशन ऑथों, स्पीच ॲड लैंग्वेज पॅथॉलॉजी या अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या फेरीला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे.'आयुष' अंतर्गत होमिओपॅथे व युनानी पदवी अभ्यासक्रमांच्या जागांचा तपशील २९ सप्टेंबर रोजी सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर जाहीर होईल. त्यानंतर ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा ऑनलाइन पसंतीक्रम भरता येईल, दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी ४ ऑक्टोबर रोजी जाहीर होईल. त्यानंतर ५ ते ९ ऑक्टोबरदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयांमध्ये जाऊन प्रवेश निश्चित करावा लागेल.

## मनोज जरांगे यांचाही दसरा मेळावा!

### राजकीय भूमिका स्पष्ट करण्याची शक्यता



**मुंबई** : मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील हेदेखील आता दसरा मेळावा घेणार आहेत. त्यासाठी नारायणगडावर जागेची चाचपणी करण्यात येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय भूमिका ते या मेळाव्याच्या माध्यमातूनच स्पष्ट करतील, अशी शक्यता देखील व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता या दसरा मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील राजकारणात दसरा मेळाव्यांना मोठे महत्त्व आहे. शिवसेनेच्या शिवाजी पार्कवर होणाऱ्या दसरा मेळाव्याची चर्चा जगभरात होत होती. आता उद्धव ठाकरे देखील तेथे मेळावा घेतात. त्यातच आता एकनाथ शिंदे हे देखील दुसरा मेळावा घेत आहेत. दुसरीकडे पंकजा मुंडे बीडमध्ये तर नागपूरचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा देखील चर्चेत असतो. त्यातच आता मनोज जरांगे पाटील देखील दसरा मेळाव्याच्या माध्यमातून मराठा समाजाची संवाद साधणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे उमेदवार उभे करण्याची घोषणा त्यांनी या आधी केली होती. त्यामुळे या संदर्भातली भूमिका ते या मेळाव्यात स्पष्ट करतील, अशी शक्यता देखील वर्तवली जात आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सहाव्यांदा उपोषण सुरू केले होते. मात्र अचानक त्यांनी उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. त्यानंतर त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर मधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

इतकेच नाहीतर पाटील यांना भेटायला येणाऱ्या लोकांना देखील न येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दवाखान्यात कोणीही येऊ नका, लवकरच आपली भेट होईल, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले होते.

त्यानंतर आता दसरा मेळाव्याची चाचपणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील आता दसरा मेळाव्याच्या माध्यमातूनच आपली भूमिका स्पष्ट करतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## लाडक्या बहिणींचे महायुतीतील तिनही भाऊ लबाड - भास्कर जाधव



**नागपूर** : राज्यात महिलांसाठी सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण ही योजना म्हणजे लाडकी खुर्ची योजना आहे. १ कोटी १३ लाख ३२३ महिलांना याचा लाभ मिळणार असून ५ कोटी महिला मात्र वंचित राहणार आहेत. देवा भाऊ, दादा एकनाथ, दादा असे तिघेही या योजनेचे श्रेय घेत असलेले तीनही भाऊ लबाड आहेत, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीच्या निमित्ताने भास्कर जाधव नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने महिला, शेतकरी आणि युवकांसाठी विविध योजना जाहिर केल्या तरी सर्व योजनांचा त्यांना निवडणुकीत काहीच फायदा होणार नाही. जनतेचा त्यांच्यावर विश्वास नाही. हे तीनही भाऊ लबाड आहे. बहिणी यांना भाऊ मानायला तयार नाहीत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव होणार निश्चित असल्याचे जाधव म्हणाले.

विदर्भाचा संपर्क नेता म्हणून निवड झाल्यानंतर जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी विदर्भातील विविध जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांचा बैठकी घेत आहे. विदर्भातून कुठले उमेदवार द्यावे याबाबत चर्चा करुन चाचपणी केली जात आहे. लोकसभा निवडणुकीत रामटेकची जागा आम्ही उदार अंतकरणाने काँग्रेससाठी सोडली होती. पूर्व विदर्भात २८ जागा आम्ही लढल्या होत्या. त्यातील काही जागा काँग्रेसकडे असल्या तरी नैसर्गिकदृष्ट्या त्यातील ८ ते १० मतदारसंघ आम्हाला परत मिळावे अशी आमची मागणी आहे. आज सळसळत्या रक्ताचा शिवसैनिक विदर्भात आहे, म्हणून त्या आठ ते दहा जागा परत मिळाल्या पाहिजे असी मागणी महाविकास आघाडीच्या बैठकीत केली आहे. नागपूर जिल्ह्यातील रामटेक, कामठी, उमरेड, हिंगणा, दक्षिण नागपूर आणि पूर्व नागपूर या जागांसाठी आम्ही आग्रही आहोत.

चर्चेतून या सगळ्या जागांवर आम्ही दावा केला असल्याचे जाधव म्हणाले. मी जागा वाटप समितीमध्ये नाही, त्यात हस्तक्षेप करीत नाही. २६ जागा दिल्या आहेत, ५६ विधानसभा मतदार संघावर आमचे लक्ष आहे, ५६ पैकी ३६ जागा निवडून आणण्याचे आमचे उद्दिष्ट असल्याचे जाधव म्हणाले. प्रकाश आंबेडकर यांनी आमच्या जागांबाबत चिंता करु नये.

जागा वाटपाचे काम आम्ही आंबेडकर यांना दिले नाही आणि त्यांच्या जागा वाटपाचे काम आम्ही घेतले नाही. त्यामुळे आमचे आम्ही बघून घेवू असेही जाधव म्हणाले. उद्धव ठाकरे उद्या रविवारी घनश्याम मक्कासरे यांच्या संस्थेत शिवाजी महाराज पुतळा उद्घाटनाला येत आहे. वेळ मिळाल्यास नागपूर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी निवडणुकी संदर्भात त्यांच्याशी संवाद साधतील असेही जाधव म्हणाले.

## महात्मा फुलेंनीच शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली



**नाशिक** : महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याचा लोकार्पण सोहळा नाशिकमध्ये संपन्न झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, छगन भुजबळ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अजित पवारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीबद्दल स्पष्टपणे विधान केले आहे. मागे पुण्यात मोहन भागवतांनी केलेल्या विधानानंतर वाद उभा राहिला होता.मोहन भागवत यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांचा दाखला देताना म्हटले होते की, इंग्रजांच्याविरुद्ध लढतानासुद्धा शिवाजी महाराज इथेच होऊन गेले. इथे सुद्धा त्यांचे स्मरण व्हावे म्हणून जागरण केले. रायगडावर उत्सव सुरु केला. टिळकांनी ते सर्व शोधून काढले वगैरे वगैरे.. ही इथली स्थिती असतानासुद्धा रविंद्रनाथ टागोरांनीही शिवाजी महाराजांवर कविता लिहिली.अजित पवार म्हणाले की, महात्मा फुले यांनी पुणे ते रायगड पायी चालत जाऊन पाला-पाचोळ्यात असलेली शिवरायांची समाधी शोधून काढली, हे मी मनाचे सांगत नाही याचे कागदपत्रं आहेत. त्यांनी समाधीची साफसफाई करुन फुले वाहिली, हे सगळे कागदपत्रांमध्ये आहे. त्यावरुनच मी बोलतोय. पुढे महात्मा फुलेंनी पुण्यात शिवछत्रपतींचा सोहळा सुरु केला असे अजित पवार म्हणाले.लोकसभा निवडणुकीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजपवर जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली होती. अजित पवारांना सोबत घेण्यावरुनही संघाने भाजपला खडेबोल सुनावले. लोकसभा निवडणुकीतील पराभवाला तेही एक कारण असल्याचे लेखामधून म्हटलं गेलं. त्यानंतर अजित पवार गटाकडून सातत्याने प्रतिक्रिया येत होत्या. दरम्यान, शनिवारी नाशिकमध्ये पुतळा लोकार्पण सोहळ्यात बोलताना अजित पवार म्हणाले की, एवढा मोठा अर्धाकृती पुतळा मी महाराष्ट्रात पाहिला नाही. या स्मारकामुळे नाशिकच्या लौकिकात भर पडली आहे. शिवछत्रपती-फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराने आपण राज्य चालवतो. महापुरुषांचा विचार घेऊनच राज्यात निर्णय घेतले जातात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ सप्टेंबर २०२४


## महाराष्ट्रात २६ नोव्हेंबरपूर्वी विधानसभा निवडणुकीचा बार

### उमेदवार, पक्षांना पार्श्वभूमीची द्यावी लागेल जाहिरात




**मुंबई :** महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचा फड रंगण्याची चिन्हे आहेत. गत २ दिवसांपासून राज्याच्या दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकाने शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी विविध राजकीय पक्षांसह निवडणुकीशी संबंधित सर्वच भागिदारांशी झालेल्या चर्चेचा संक्षिप्त तपशील सांगितला. तसेच निवडणुकीची प्रक्रिया विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येण्यापूर्वीच म्हणजे २६ नोव्हेंबरपूर्वी पार पाडण्याचे संकेतही दिले. त्यामुळे पुढील महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक गुरुवारी सायंकाळी राज्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात या पथकाने शुक्रवारी विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली. त्यानंतर आज विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक तथा इतर भागिदारांशी चर्चा करून त्यांची निवडणुकीसंबंधीची मते जाणून घेतली. त्यानंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आपल्या दौऱ्याचा तपशील सादर केला.

राजीव कुमार म्हणाले, आम्ही दोन दिवस विविध राजकीय पक्षांसह सर्वच भागिदारांशी चर्चा केली. त्यात सर्वच पक्षांनी दीपावली, देव दिवाळी व छटपूजेसारखे सणवार लक्षात घेऊन निवडणुकीची तारीख निश्चित करण्याची विनंती केली.

राजकीय पक्षांनी निवडणुकीची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवण्याचीही सूचना केली. त्यांची ही सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण, निवडणुकीची तारीख आठवड्याच्या शेवटी ठेवल्यामुळे शहरी भागातील मतदार सुट्ट्यांचा मेळ साधून शहराबाहेर जातात. त्याचा फटका निवडणुकीच्या टक्केवारीला बसतो. त्यामुळे मतदानाची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवली जावी अशी त्यांची विनंती होती, असे राजीव कुमार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत मुंबईसह अनेक शहरांतील मतदान केंद्रांवर मतदारांची तासंतास ताटकळत उभे राहण्यासारखी गैरसोय झाली होती. त्यामुळे आगामी निवडणुकीत असे प्रकार टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची सूचनाही काही पक्षांनी केली. आयोग यासंबंधी खुर्च्या उपलब्ध करून देण्यावर विचार करेल. काही पक्षांनी निवडणुकीच्या काळात अधिकाऱ्यांच्या बदल्या तटस्थपणे करण्यावर जोर दिला. काहींनी पैशांच्या गैरवापराकडेही लक्ष वेधले. विशेषतः काही पक्षांनी वृद्ध व दिव्यांग मतदारांना दूरच्या मतदान केंद्रांपर्यंत घेऊन जाण्यात येणाऱ्या अडचणींवर योग्य ती उपाययोजना करण्याची विनंती केली.

मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणारा पोलिंग एजंट त्याच बूथवरील असावा असा आग्रहीही काही पक्षांनी धरला. निवडणूक आयोग यावरही योग्य तो निर्णय घेईल. निवडणुकीच्या काळात फेक न्यूजची मोठी समस्या असते. त्यावरही काही पक्षांनी चिंता व्यक्त केली, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

राजीव कुमार यांनी यावेळी महाराष्ट्रातील मतदारांची संख्या व इतर आकडेवारी सांगितली. ते म्हणाले, महाराष्ट्रात २८८ मतदारसंघ आहेत. यापैकी २५ मतदारसंघ अनुसूचित जमाती (एसटी), तर २९ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी (एससी) राखीव आहेत. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया त्यापूर्वी पार पाडली जाईल.

राज्यात एकूण ९.५९ कोटी मतदार आहेत. त्यात ४.५९ कोटी पुरुष, तर ४.६४ कोटी महिला मतदार आहेत. थर्ड जेंडर म्हणजेच तृतीयपंथी मतदारांची संख्या ५९९७ असून दिव्यांग मतदारही ६.३२ लाख एवढे आहेत. महाराष्ट्रात थर्डजेंडर व पीडब्ल्यूडी मतदारांची संख्याही लक्षणीय आहे. हे सदृढ सामाज व कुटुंब व्यवस्थेचे लक्षण आहे. महाराष्ट्रात पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची म्हणजे १८ ते १९ वर्ष वयोगटातील संख्या १९.४८ लाख आहे. या निवडणुकीत आमचे या तरुण मतदारांवर खास लक्ष असेल. कारण हेच तरुण मतदार भविष्यात लोकशाहीला पुढे नेण्याचा प्रयत्न करणार आहेत.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या उमेदवारांना आपल्यावरील दाखल गुन्ह्यांची स्थानिक वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांत तीनदा जाहिरात द्यावी लागणार आहे. त्या जाहिरातीत त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल आहेत? ते सांगावे लागणार आहे. राजकीय पक्षांनाही हा नियम लागू असेल. त्यांनाही गुन्हे दाखल असलेल्या उमेदवाराला उमेदवारी का दिली? हे नमूद करावे लागेल.

राजीव कुमार यांनी यावेळी विधानसभा निवडणुकीत आयोगातर्फे करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचीही माहिती दिली. ते म्हणाले, ३ वर्षांहून अधिक काळ एकाच ठिकाणी असणाऱ्या विशेषतः स्वतःच्या जिल्ह्यात पोस्टिंग असणाऱ्या अधिकाऱ्यांची तत्काळ बदली केली जाईल. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याविषयी तक्रार मिळाली आहे. त्यावर योग्य ती कारवाई केली जात आहे. ट्रान्सफर व पोस्टिंगमध्ये पूर्ण पारदर्शकता राबवली जाईल. निवडणुकीची वेळ, टप्पे व तारीख लवकरच जाहीर केली जाईल.

राज्यात १.८६ लाख मतदान केंद्र आहेत. त्यापैकी ५२५८५ केंद्र शहरी भागात, तर ५७,६०१ केंद्र ग्रामीण भागात आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर सरासरी ९५० मतदार असतील. विशेषतः ३५० मतदान केंद्रांचे व्यवस्थापन तरुणांकडे असेल, असे राजीव कुमार म्हणाले.

निवडणूक काळात पैशाचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे एटीएमसाठी पैसे घेऊन जाणाऱ्या वाहनांवर रात्री ६ ते सकाळी ८ वाजेपर्यंत पैशांची वाहतूक करता येणार नाही. या काळात रुग्णवाहिका, बँक व पतसंस्थांवर विशेष लक्ष ठेवले जाईल.

निवडणुकीच्या काळातील गैरप्रकार टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने सुविधा पोर्टल नामक एक ॲप तयार केले आहे. या ॲपवर मतदारांना आपल्या तक्रारी करता येईल. उदाहरणार्थ, एखाद्या ठिकाणी काही घटना घडली किंवा उशिरापर्यंत मतदान सुरु असेल, तर केवळ फोटो काढून या ॲपवर अपलोड केला की, ९० मिनिटांत निवडणूक आयोगाची टीम तिथे पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

## सहावी ते आठवीच्या मुलांसाठी दप्तराविना शाळा

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परीषदेच्या शाळांध्ये पुढील दहा शनिवारी आनंददायी शनिवार व दप्तराविना उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. हा उपक्रम ५ ऑक्टोबरपासून जिल्हाभरातील शाळांमध्ये राबविला जाणार आहे. त्यामध्ये प्रत्येक शनिवारी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये आठवड्याचा प्रत्येक शनिवार हा वाचन दिवसाअंतर्गत विविध उपक्रम घेतले जात आहेत. यासोबतच राज्य मंडळाच्या सर्व शाळेमध्ये आनंददायी शनिवार या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे राज्य शासनाचे निर्देश आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील टास्कची पूर्ती करण्याच्या अनुषंगाने आनंददायी शनिवार उपक्रमाची अंमलबजावणीसाठी आता इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी १० दिवस दप्तराविना शाळा या उपक्रमाची राबवण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यासाठी आनंददायी शनिवार; तर इयत्ता सहावीते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी १० दिवस दप्तराविना शाळा या उपक्रम राबवला जाणार आहे. यासाठी आंनददायी शनिवार-कृतीपुस्तिका देण्यात आली आहे.

या पुस्तीकेमध्ये आनंददायी शनिवार उपक्रमचे स्तर व इयत्तानिहाय कृती सोदाहरण देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी उपक्रमाची अंमलबजावणी करुन नोंदी ठेवायची आहे.

## न्या. चांदीवाल यांनी क्लिन चिट दिल्याने अहवाल दडपण्यात येतोय? अनिल देशमुखांचा सरकरला सवाल



**पुणे :** न्यायमूर्ती चांदिवाल यांनी महाराष्ट्र सरकारकडे दाखल केलेला अहवाल विधानसभेत का सादर केला नाही?, न्या.चांदिवाल कमिटीच्या अहवालावर 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' अजून ही का तयार केला नाही?,

राज्याचे माजी गृहमंत्री भ्रष्टाचारात सहभागी नसल्याचे सांगणाऱ्या चांदिवाल अहवालातील माहिती लपवली जात आहे का? असे प्रश्न उपस्थित करणारी कायदेशीर नोटीस राज्याचे माजी गृहमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते अनिल देशमुख यांनी ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रीया अवले, ॲड. रमेश तारू, ॲड. संदीप लोखंडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे मुख्य सचिव यांना पाठवलेली आहे.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना अनिल देशमुख म्हणाले, मी गृहमंत्री असताना माझ्यावर जो आरोप झाला त्याची चौकशी करण्याची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडे केली होती. यानंतर सरकारच्या वतीने न्या. कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग नेमण्यात आला. न्या. चांदीवाल यांनी सरकारकडे जो 1400 पानांचा चौकशी अहवाल सार्वजनिक करावा यासाठी मी सातत्याने मागणी करीत आहे, अहवाल सार्वजनिक करण्यासाठी मी अनेक वेळा विधानसभेत मागणी केली.या संदर्भात राज्यपाल, मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना अनेक वेळा पत्र सुध्दा लिहले.

तरी सुध्दा तो अहवाल सार्वजनिक करण्यात आला नाही. परंतु अजुनही सरकारने न्या. चांदीवाल अहवाल प्रसिध्द केला नाही उलट त्याचे राजकारण करून माझ्यावर खोटे आरोप केले जात आहेत. त्यामुळे मी आता ॲड. असीम सरोदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री व राज्याचे मुख्य सचिव यांना कायदेशिर नोटीस पाठविल्याची माहिती माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली.

गृहमंत्री असतांना मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमविर सिंग यांनी माझ्यावर १०० कोटी रुपये वसुलीचा आरोप केला केला होता. यानंतर मी या आरोपाची तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पत्र लिहुन चौकशी करण्याची मागणी केली होती. यानंतर कमिशन ऑफ इंक्विरी ॲक्ट अंतर्गत उच्च स्तरीय चौकशी समितीची स्थापना केली. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला.

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी मी गृहमंत्री पदाचा राजीनामा सुध्दा दिला. यानंतर जवळपास ११ महिने या प्रकरणाची चौकशी झाली. यात अनेकांचे जबाब घेण्यात आले. संपुर्ण चौकशी केल्यानंतर न्या. चांदीवाल यांनी त्यांचा अहवाल सरकारला सादर केला. परंतु अहवाल सादर केल्यानंतर काही दिवसातच महाविकास आघाडीचे सरकार पडले त्यामुळे न्या. चांदिवाल आयोगाचा अहवाल तसाच राहिला असेही अनिल देशमुख यांनी यावेळी सांगितले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanashaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ सप्टेंबर २०२४

# मनाला ऊर्जा देणारा ऊर्जावान गौरव ग्रंथ : छावणी

विख्यात कवी, समीक्षक, विचारवंत अर्जुन डांगळे यांच्या चौफेर कार्यकर्तृत्वावर बेतलेला गौरव ग्रंथ विचारांना समृद्ध करीत मनाची श्रीमंती वाढवणारा आहे. अर्जुन डांगळे यांनी आपल्याला पँथर म्हणून पँथर चळवळीला, आक्रमकतेला छेद देणारी संयत, समंजस परिमाण देत कार्यकर्ता व नेता म्हणून भरीव कार्य केले. डांगळेंच्या पंचाहत्तरीनिमित्त सायन पब्लिकेशनने 'छावणी' हा गौरव ग्रंथ प्रकाशित केलाय. डॉ. महेन्द्र भवरे, डॉ.सुनील अवचार, किशोर मेढे यांनी अफाट परिश्रम घेऊन हा मोलाचा गौरव ग्रंथ प्रकाशित केलाय. पाचशे पन्नास पृष्ठांचा हा गौरव ग्रंथ ग्रंथालयाची गुणवत्ता वाढवणाराच आहे.

त्यांच्या साहित्यावर डॉ. रावसाहेब कस्बे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. संजय मून, डॉ. भास्कर पाटील, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. भालचन्द्र फडके, बी. व्ही. जोंधळे, डॉ. गिरीश मोरे इत्यादी अनेकांनी प्रकाशझोत टाकलाय.

अर्जुनराव प्रखर मानवतावादी व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. त्यांनी आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार म्हणून चोख भूमिका अदा केली. रिपब्लिकन चळवळीतील विचारवंत, विवेकी व संयमी नेता म्हणून मी त्यांच्याकडे बघतो.

त्यांच्या या संघर्षप्रवण झुंजार व्यक्तिमत्त्वावर सुभाष देसाई, रामदास आठवले, नीलमताई गोऱ्हे, ज. वि. पवार, उर्मिला पवार, हिरा बनसोडे इ. अनेक दिग्गजांनी लिहिले आहे.



अर्जुन डांगळे यांनी चळवळीला नेता असून कार्यकर्ता होऊन बळ दिले. त्यांचे संघटन कौशल्य, अजोड व उल्लेखनीय राहिले आहे.

चळवळीचा संदर्भ असलेले उत्तम कांबळे, अविनाश महातेकर, शांताराम पंदेरे, राही भिडे, दिलीप जगताप, अनिल ठाणेकर यांचे लेख ऊर्जा देणारे आहेत. बाबूराव बागूल, श्रीधर जाधव, प्र. श्री. नेरूरकर, केशव मेश्राम, लक्ष्मणशास्त्री जोशी, दया पवार, कमलेश्वर, दिनकर गांगल, शरचन्द्र मुक्तिबोध, म. भि. चीटणीस यांच्याशी झालेला पत्र संवाद महत्त्वाचा असून अनेक संदर्भ सूचित करणारा आहे. यामुळे

त्यांच्यातला मानवतावादी संवादी माणूस जाणवतो. विचारवंत डॉ. महेन्द्र भवरे त्यांनी घेतलेली त्यांची मुलाखत त्यांच्या विनयशील, विवेकी वृत्तीची आठवण करून देणारी आहे.

आंबेडकरी साहित्याच्या पहिल्या पिढीचे मातब्बर कवी म्हणून 'छावनी हलते आहे' या कविता संग्रहाने ओळख करून दिली. डॉ. महेन्द्र भवरे यांची मुलाखत या गौरव ग्रंथात आहे. पँथरची स्थापना कधी झाली ? संस्थापक कोण? या प्रश्नाचे उत्तर देतांना अर्जुन डांगळे म्हणतात, ''पँथरची स्थापना ९ जुलै १९७२ ला झाली. पँथरचा पहिला मेळावा कामाठीपुरयात १ व २ जुलै १९७२ रोजी झाला. त्याची नोंद आहे. पँथरच्या स्थापनेचे श्रेय ते दलित साहित्याला देतात. चळवळ ही कोणा एकाची मक्तेदारी नसते.'' हे अर्जुन डांगळेंनी दिलेले संयमित उत्तर खूपच बोलके आहे ! सदर मुलाखत खूपच महत्त्वाची आहे. त्यातून पँथर, भारिप बहुजन महासंघ, नामांतर चळवळ याविषयी महत्त्वाची माहिती मिळते.

विचारवंत आहेत. ज. वि. पवार यांच्याविषयी ते म्हणतात, ''ज. वि. म्हणजे प्रखर आंबेडकरी निष्ठा! लेखणी हेच त्यांचे सामर्थ्य आहे.''

अशी विशालता त्यांनी इतरांविषयीही नोंदवली आहे. या ग्रंथातील डॉ. संजय मून यांचा प्रदीर्घ लेख अर्जुन डांगळे यांच्या चौफेर कार्यावर प्रकाश टाकणारा आहे.

डॉ. रावसाहेब कसबे यांनी दलित चळवळीचे अंतरंग उकलून दाखवले आहेत. डॉ. अशोक इंगळे यांनी डांगळेच्या कथांचा वांचितांचा ध्यास घेतलेली कथा म्हणून उचित गौरव केला आहे. बी. व्ही. जोंधळे म्हणतात, ''दलित चळवळीचा उल्लेख जगभर दलित मुव्हमेंट असा होतो. ६० च्या दशकात उदयास आलेल्या या दमदार चळवळीने गं. बा. सरदार, भालचन्द्र फडके, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, फ. मुं. शिंदे, या दलितेकर लेखकांना जोडून घेतले. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या 'अस्मितादर्श' ने दलित साहित्याची चळवळ नेटाने चालविली.'' समीक्षक विचारवंत डॉ. भास्कर पाटील म्हणतात, ''आंबेडकरी राजकारणाचे भाष्यकार म्हणूनही अर्जुन डांगळे यांच्या नावाचा उल्लेख केला जातो.

त्यांनी वाङ्मयातील ललित-वैचारिक अशी दोन्ही दालने समृद्ध केलीत. आंबेडकरी समीक्षा दालनही समृद्ध केले.''जवळपास चाळीस दिग्गज लेखक-लेखिकांनी आपल्या चिंतनपर लेखनाने हा गौरव ग्रंथ समृद्ध केलाय. या लेखात सर्वांचा उल्लेख करता येणार नाही. आपल्यावरही असा भरदार गौरवग्रंथ निघावा असं वाटायला भाग पाडणारा हा श्रीमंत गौरव ग्रंथ आहे. छायाचित्र विभागही खूपच बोलका आहे. त्यात आयु अर्जुन डांगळे व चारुशीला डांगळेया दांपत्याच्या छायाचित्राने सुरवात होते. आई वडील, गणगोत व मान्यवरांची छायाचित्रे लक्ष वेधून घेतात.यात बाळासाहेब ठाकरे, मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे, सुशिलकुमार शिंदे, बाबा आढाव, कांशीराम, रा.सु.गवई, मुलायमसिंग, प्रकाश आंबेडकर, ना. रामदास आठवले, कॉ. तारा रेड्डी, मृणालताई, कॉ. अहिल्या रांगणेकर, ज. वि. पवार, सुभाष देसाई, डॉ. सीताराम येचुरी, बॅ. ए. आर. अंतुले, डॉ. यशवंत मनोहर, बाबूराव बागूल, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. रावसाहेब कसबे, विलासराव देशमुख, मधू दंडवते, कॉ. इन्द्रजीत गुप्ता, संगीतकार नौशाद, कुमार सप्तर्षी, गुलजार, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, निळूभाऊ फुले, असे कितीतरी दिग्गज आहेत.

सायन पब्लिकेशन्सची ही कृती छपाई, मांडणी, कागद यांचा विचार केल्यास सर्वांगसुंदर कृती आहे. ग्रंथालयांनी या संदर्भमूल्य असलेल्या ग्रंथाला आवर्जुन स्थान द्यावे, अशी ही कृती आहे. शांत, संयमी, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे धनी, मित्रवर्य अर्जुन डांगळे साहेबांना दीर्घ आयुरारोग्य लाभो ही शुभेच्छा !

**छावणी**
अर्जुन डांगळे गौरव ग्रंथसायन पब्लिकेशन्स प्रा.लि.,पुणे.
पृष्ठे – ५५०
मूल्य - रु. ९००/-

**समीक्षक : डी. बी.जगत्पुरिया**
'संगर', पाण्याच्या टाकीजवळ, मीरानगर, पडेगांव, औरंगाबाद – ४३१००२
मो. ९८६०४८५३९८

## प्राजक्ता माळीने धरला 'मदनमंजिरी' गाण्यावर ठेका



**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र फक्त आणि फक्त 'फुलवंतीची' सिनेमाची चर्चा रंगली आहे.सिनेमाची टीझर प्रदर्शित झाल्यानंतर सिनेमातील नवं गाणं प्रदर्शित झालं आहे. प्रदर्शित झालेल्या नव्या गाण्याचं नाव 'मदनमंजिरी' असं आहे.

'मदनमंजिरी' गाण्यावर अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने ठेका धरला आहे. बहारदार नृत्य, मनाला भुरळ घालणारी अदाकारी आणि चैतन्य निर्माण करणाऱ्या घुंगरांच्या आवाजाने चाहत्यांना घायळा करायला 'मदनमंजिरी' सज्ज झाली आहे.

सध्या सर्वत्र फक्त आणि फक्त 'फुलवंती' सिनेमातील मदनमंजिरी गाण्याची चर्चा सुरु आहे. 'अशी मी – मदनमंजिरी सुबक ठेंगणी लखलखते सुंदरी... अशी मी – मदनमंजिरी चटक चांदणी चमचमते अंबरी' असे गाण्याचे बोल आहेत. प्राजक्ता हिने दमदार नृत्य करत चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे.

'मदनमंजिरी' गाण्याची शब्दरचना गीतकार डॉ. प्रसाद बिवरे यांची असून वैशाली माडे यांच्या आवाजाने या गाण्याला चारचाँद लागले आहेत. संगीत अविनाश-विश्वजीत यांचे तर नृत्यदिग्दर्शन उमेश जाधव यांचे आहे. गाणं सध्या चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय आहे.

गाणं आणि प्राजक्ताचा डान्स पाहिल्यानंतर नेटकरी कमेंट करत प्रतिक्रिया देत आहेत. एक नेटकरी कमेंट करत म्हणाला, 'प्राजक्ता आणि गष्मिर दोघांसाठीपण सर्वांनी चित्रपट गृहात गेलेच पाहिजे', दुसरा नेटकरी म्हणाला, 'हा मराठी सिनेसृष्टीतील यंदाच्या वर्षीचा जास्त कमाई करणारा चित्रपट असणार आहेय... जय महाराष्ट्र', अन्य एक नेटकरी म्हणाला, 'सुंदर सादरीकरण सुंदर नृत्य सुंदर आवाज...'



## बच्चू कडूंच्या प्रहार पक्षाचा पहिला उमेदवार जाहीर



**वर्धा :** राज्यात सध्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. विधानसभा निवडणूका अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत.

यादरम्यान प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी विधानसभेसाठीचा पहिला उमेदवार जाहीर केला आहे. बीआरएस मधून प्रहारमध्ये प्रवेश केलेल्या जयकुमार बेळखडे यांच्या नावाची आर्वी विधानसभेवर प्रहारचा उमेदवार म्हणून नाव घोषित करण्यात आले आहे.

तिसरी आघाडीमहाराष्ट्रात प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू, स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी निर्माण केलेल्या तिसऱ्या आघाडीकडून नेमक्या किती जागा लढविल्या जातात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. देवळी, हिंगणघाट आणि वर्धा या चारही विधानसभा क्षेत्रात तिसऱ्या आघाडीकडून उमेदवार रिंगणात उतरविले जाणार असण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.

भावी मुख्यमंत्री तिसऱ्या आघाडीशिवाय ठरणार नाहीआमचे दहा जरी आमदार निवडून आले तर आम्ही गणपती बसविल्याशिवाय राहणार नाही, असा टोला लगावत महाराष्ट्रात भावी मुख्यमंत्री तिसऱ्या आघाडीशिवाय ठरणार नसल्याचे संकेत आमदार बच्चू कडूंनी दिले आहेत.

## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयाची अजिंठा येथे शैक्षणिक सहल



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी बी. ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक सहलीचे (Study Tour) 'अजिंठा लेणी' येथे आयोजन करण्यात आले. या सहलीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांचे मार्गदर्शन लाभले. या सहलीचे आयोजन इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे व प्रा. कविश्री देशमुख, प्रा. दत्तू लहाने यांनी केले.

बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक सहलीच्या नियोजनाचे महत्व निश्चितच असून या सहलीद्वारे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून आपल्या अभ्यासक्रमातील घटकांचे अध्ययन केले. योग्य रीतीने आकलन होण्यासाठी अशा अभ्यासपूरक उपक्रमांची गरज असते त्यानुसार या सहलीच्या अनुभवाचा विद्यार्थिनींना निश्चतच उपयोग होईल व या उद्दिष्टानेच हा उपक्रम इतिहास विभागाने आयोजित केला.

याप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी विद्यार्थिनींना अजिंठा लेणीचा इतिहास, तसेच या लेण्या गौतम बुद्धांच्या जीवनातील विविध प्रसंगावर आधारित असून यामध्ये सभामंडप, स्तंभ, छतावरील तसेच भिंतीवरील चित्रे, पद्मपाणी, जातक कथा अशी अप्रतिम चित्रे, विविध लेण्या व अभ्यासक्रमात समाविष्ट असलेलेल्या विविध वर्णनात्मक घटकांचा पुन: प्रत्यय विद्यार्थिनींना दिला तसेच संपूर्ण लेण्या व परिसर इ. विषयी माहिती दिली.

बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी या सहलीविषयीचे आपले अनुभव सांगताना या शैक्षणिक सहलीचा त्यांच्या अभ्यासासाठी निश्चितच फायदा झाल्याचे सांगितले.

एक शैक्षणिक समृद्ध अनुभवाच्या ठेव्यासह, नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेऊन विद्ययार्थीनी घरी परतल्या.

## युवासेनेच्या वतीने विद्यापीठात जल्लोष



**छत्रपती संभाजीनगर :-** मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर अधिसभेच्या निवडणूकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या युवा सेनेने १० पैकी १० जागा मिळवून दणदणीत विजय मिळवल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात युवा सेनेकडून जल्लोष करण्यात आला.

या प्रसंगी भारतीय विद्यार्थी सेनेचे विद्यापीठ प्रमुख डॉ. तुकाराम सराफ यांनी सहकाऱ्यांना पेढे भरविले. यावेळी बोलतांना डॉ. तुकाराम सराफ म्हणाले की, या निवडणुकीने पुन्हा एकदा आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्त्वावर विश्वास टाकला आहे.

विरोधकांनी विशेषत: अभाविप ने सत्तेचा वापर करून अनेक अडथळे आणले तरीही युवा सेनेने त्यांचा धुव्वा उडविला. युवा सेना सचिव वरूण सरदेसाई यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे विरोधकांना संधीच मिळाली नाही. त्यामुळे या दोघांचेही अभिनंदन करण्यात आले. यावेळी विद्यापीठ युवा सेनेचे प्रमुख डॉ. नामदेव कचरे, समाधान नागरे, एहतेशाम कादरी, योगेश उबाळे, दत्ता सोळूंके सहीत अन्य युवा सैनिक उपस्थित होते.

## बारामतीत फकीराप्रमाणे निवडणूक लढवली : 'पक्ष-चिन्ह परत घेत नाही, तो पर्यंत लढा' - सुप्रिया सुळेंचे मोठे वक्तव्य

**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक जवळ आली असून त्यामुळे या दृष्ट्रीकोणातून राजकीय नेत्यांच्या हालचाली देखील वाढल्या आहेत. याच दरम्यान शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे मोठे विधान समोर आले आहे.

एका मुलाखतीदरम्यान सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी बारामती लोकसभा मतदारसंघातून फकीराप्रमाणे निवडणूक लढवली. मला विजयाची शंभर टक्के खात्री नव्हती.

सुप्रिया सुळे यांना महाविकास आघाडी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर कदाचित हे अशक्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. निवडणुकीनंतरच योग्य व्यक्तीला मुख्यमंत्री केले जाईल, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

'तोपर्यंत लढा सुरूच राहणार'

ईशान्य मुंबईतील अणुशक्ती नगर येथे महाविकास आघाडीच्या (एमव्हीए) मेळाव्याला संबोधित करताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, जोपर्यंत वडील शरद पवार यांनी तयार केलेला पक्ष आणि निवडणूक चिन्ह त्यांना परत देत नाही तो पर्यंत माझा लढा संपणार नाही. गेल्या वर्षी जुलैमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार समर्थक आमदारांसह शिंदे सरकारमध्ये सामील झाले होते. यानंतर निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह 'घड्याळ'दिले होते. आता शरद पवार यांच्या पक्षाला शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस असे नाव देण्यात आले आहे.

सुप्रिया सुळेंचा महायुतीवर हल्लाबोल

ईशान्य मुंबईतील अणुशक्ती नगरमध्ये महाविकास आघाडीच्या सभेला संबोधित करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "जोपर्यंत मी पवार साहेबांनी स्थापन केलेला पक्ष आणि त्यांचे निवडणूक चिन्ह परत देत नाही तोपर्यंत माझा लढा संपणार नाही." युतीमधील नेत्यांवर देखील त्यांनी टीका केली. "ज्यांना नवाब मलिक यांची ॲलर्जी होती, त्यांचे काय झाले?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.


